# बेनोडा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील लोणीत गावठी दारुचा उधम

## गावातील युवकांना व्यसन जडल्याने पालक चिंतेत : दारु पिवुन मृत्यूच्या संख्येमध्ये वाढ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील महत्वाचे ठिकाण असलेल्या लोणी गावामध्ये सहज उपलब्ध होणाऱ्या गावठी दारुमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे चित्र समोर येत आहे. कमी किंमतीत आणि सहज मिळणाऱ्या या दारुमुळे अनेक तरुण त्याच्या आहारी जात असून त्यांच्या आरोग्यावर तसेच कुटुंबियांच्या जीवनावर गंभीर परिणाम होत आहे, मात्र बेनोडा (शहीद) पोलिसांसह राज्य उत्पादन शुल्क विभागाला मोठ्या प्रमाणात आवक असल्यामुळे या दारु विक्रेत्यांकडून जाणुन–बुजून दुर्लक्ष केल्या जात असून याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे. काल रात्रीच्या सुमारास योगेश कोसे नामक युवकाचा मृत्यू सुध्दा दारुमुळेच झाल्याची चर्चा गावात सुरु झाल्यामुळे आता गावकरी सुध्दा अवैध दारु विक्रीविरुध्द पेटुन उठण्याची भाषा बालु लागले आहेत.

विशेषतः काही ठिकाणी बेकायदेशीरपणे तयार होणारी ही दारु निकृष्ट दर्जाची असल्याने ती आरोग्यास अत्यंत घातक ठरत आहे. या दारुमध्ये वापरल्या जाणाऱ्या घातक रसायनांमुळे अनेकांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असून, काही प्रकरणांमध्ये मृत्यूही होत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

गावातील युवक कामधंदा नसल्यामुळे किंवा चुकीच्या संगतीमुळे व्यसनाच्या आहारी जात असल्याचेही दिसून येते. यामुळे कुटुंबांमध्ये आर्थिक अडचणी वाढत असून सामाजिक समस्याही निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने बेकायदेशीर दारू विक्रीवर कठोर कारवाई करणे गरजेचे असल्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे तसेच युवकांमध्ये जनजागृती करुन व्यसनमुक्तीचे अभियान राबविण्याचीही आवश्यकता व्यक्त होत आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षकांसह वरिष्ठ अधिकारी कितीही अवैध व्यवसाय बंद असल्याचे सांगत असले तरी सुध्दा शहिदांची भुमि असलेल्या वरुड तालुक्यातील बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत अनेक गांवामध्ये वरली मटका व गावठी दारुची विक्री मोठ्या प्रमाणात सुरु असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. याबाबत नागरिकांकडून ठाणेदार विवेक देशमुख यांचेकडे अनेकांनी माहीती दिली परंतु त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करुन माहीती देणाऱ्यालाच दमदाटी केल्या गेली त्यामुळे नागरिकांनी प्रसिध्दीमाध्यमांकडे धाव घेतली व अवैध व्यवसायांबाबतचे पुरावे प्रसिध्दीमाध्यमांना सादर करुन वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन सर्वसामान्यांना न्याय मिळवुन देण्याची मागणी केली आहे.

बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध व्यवसायांनी पुन्हा डोके वर काढले असून आतापर्यंत पुर्णतः बंद असलेला वरली मटका आणि गावठी दारु खुलेआमपणे या पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गाडेगांव, लोणी, खडका, जामगांव, हातूर्णा, वाडेगाव, काटी, मांगरुळी (पेठ), इत्तमगांव, सांवगासह मध्यप्रदेशालगत असलेल्या गावांमध्ये सुरु आहे. जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांनी स्वतः धाडी घालुन अवैध व्यवसायिकांवर कठोर कार्यवाहीची मागणी केली आहे.

स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये बेनोडा या गावाचे नांवे बेनोडा (शहीद) म्हणुन घेतले जाते. या पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या इत्तमगांव, लोणी, बेनोडा, पळसवाडा या गावातून सुध्दा मोठ्या प्रमाणात शहीदांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाची आहूती दिली, असे असतांना या पोलिस स्टेशन अंतर्गत अवैध व्यवसाय सुरु राहावे, याबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैध व्यवसायिकांवर वचक निर्माण करण्यासाठी थेट प्रत्येक गावांमध्ये धाडसत्र राबवुन त्यांचेवर कार्यवाही करावी जेणे करुन जिल्हा पोलिस अधिक्षक अवैध व्यवसाय बंद असल्याबाबतचा गवगवा करीत आहे, ते उघड होवुन खरे काय? ते समोर येईलच, अशी आशाही ग्रामस्थांकडून व्यक्त केल्या जात आहे.




❝ राज्य उत्पादन शुल्क विभाग सुध्दा केवळ वसुलीमध्ये मग्न असुन अवैध दारु विक्रीवर निर्बंध ठेवण्याचे कार्य हे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे असतांना या विभागाच्या वतीने एका वसुली प्रतिनिधीची नेमणुक करण्यात आली असून त्याचे मार्फत हा विभाग वसुली करुन अवैध दारु विक्रेत्यांकडे डोळेझाकपणा करीत असल्याचे बोलल्या जात असून शासनाने एक मोर्शी येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय काढून घ्यावे, अन्यथा त्यांचेवर कारवाही करण्याची मागणी होत आहे.

❝ जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद हे अतिशय शिस्तप्रिय अधिकारी म्हणुन परिचीत आहेत. अवैध व्यवसायावर नियंत्रण मिळविण्याकरीता जिल्हा पोलिस अधिक्षकांनी एक विशेष टिम सुध्दा नियुक्ती केली आहे, अशा स्थितीत या टिमने किमान काटी, वाडेगांव, लोणी, पेठ, वघाळ, हातुर्णा, मांगरुळी या परिसरात फेरफटका जरी मारला तरी खुलेआमपणे अवैध व्यवसाय सुरु असल्याचे दिसुन येतील, असे सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे आहे.



❝ लोणी व परिसरामध्ये व्यसनाधिनता मोठया प्रमाणात वाढल्यामुळे अनेक युवकांचा केवळ दारुमुळे मृत्यू होत असल्याचे दिसुन येत आहे. गेल्या २ वर्षांत किमान १० युवकांचा मृत्यू केवळ दारुच्या व्यसनाधिनतेमुळे झाल्याचे बोलल्या जात असून काल योगेश श्रीराम कोसे नामक युवकाचा मृत्यू दारुमुळेच झाल्यामुळे गावकरी संतप्त झाले आहेत, योगेश हा आईवडिलांना एकमेव मुलगा असल्यामुळे कोसे परिवारावर मोठे संकट कोसळले आहे. लोणी येथील बिट जमादार व ठाणेदार यांना अवैध विक्री करणाऱ्यांची नावे आणि ठिकाणे माहीती असतांना सुध्दा खुलेआमपणे दारु विक्री होत असल्यामुळे आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. यापुर्वी सुध्दा अनेक युवकांचा व्यसनाधिनतेमुळे मृत्यू झाल्याने अद्याप या अवैध विक्रीवर निर्बंध लादण्यात न आल्याने पोलिसांचे साटेलोटे असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केल्या जात आहे.

## पार्डी शेत शिवारात विजेच्या धक्क्याने ५० वर्षीय ईसमाचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – येथील संभाजीनगर स्थित एका ५० वर्षीय युवकाचा विजेच्या जोरदार धक्क्यामुळे मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजताचे सुमारास उघडकीस आली. मृतक युवकाचे नाव मदन मेंढे वय ५० वर्ष रा.संभाजीनगर मोर्शी असे आहे. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार मदन मेंढे यांचे रामजीबाबा परिसरात विजेचे उपकरणे दुरुस्तीचे दुकान असून ते पार्डी शेत शिवारात असलेल्या एका शेतात पाण्याच्या टाकीतील पाणी नळाद्वारे येत नसल्यामुळे ते दुरुस्तीसाठी गेले असता पाण्याच्या टाकी वरून गेलेल्या उच्च दाबा च्या ताराला स्पर्श झाल्यामुळे ते खाली फेकले गेले. लगेच त्यांना आजूबाजूच्या लोकांनी मोर्शी उपजिल्हा रुग्णालय येथे भरती केले मात्र उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मदन मेंढे यांना मृत घोषित केले. सध्या मृतकाचा प्रेत शवागारात ठेवण्यात आले असून शनिवार दिनांक ४ एप्रिल रोजी मृतकाच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात येऊन शव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. विजेच्या जोरदार धक्क्यामुळे मदन मेंढे यांचा आकस्मिक मृत्यू झाला असून महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी. अशी मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे. पुढील तपास पो–लीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण करीत आहे.

## इराणचा पूल पाडला : ८ ठार, ट्रम्प म्हणाले - ‘बरेच काही घडणार आहे!’



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**तेहरान** – अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ला करून करजमधील बी१ पुलाचे मोठे नुकसान झाले. या हल्ल्यात किमान आठ नागरिक ठार झाले असून ९५ जण जखमी झाले आहेत, असे इराणच्या सरकारी वृत्तसंस्था ’प्रेस टीव्ही’ने वृत्त दिले आहे. इराणमधील सर्वात मोठा पूल कोसळला, तो पुन्हा कधीही वापरला जाणार नाही. यापुढे बरेच काही घडणार आहे, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड यांनी म्हटले असून त्यांनी इराणला ‘खूप उशीर होण्यापूर्वी करार करा,‘ असा इशाराही दिला आहे. ’करजमधील बी१ पुलाला’ लक्ष्य करण्यात आल्यानंतर आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हल्ल्याच्या वेळी पुलाच्या जवळ असलेले इराणी प्रवासी आणि स्थानिक गावातील रहिवाशांचा मृत्यू झाला.








